## व्यक्तीपरिचय

# गायनाचार्य गणेश रावजी – पाध्येबुवा
## (एक प्रसिद्धी पराङ्मुख, तत्वनिष्ठ गानसाधक)

रत्नागिरी जिल्ह्यातील गोळवली हे एक छोटेसे खेडेगांव. रा स्व.सं. संघाचे पू. गोळवलकर गुरुजी यांचे हे मूळगाव. या गावातून अनेक गोळवलकर–पाध्ये घराणी शिक्षण, उपजीविका वगैरेसाठी देशावर विविध ठिकाणी स्थलांतरित झाली. गणेश रावजी पाध्येबुवा यांचे पूर्वज त्यापैकीच एक.

त्याकाळी गुणी जनांना संस्थानात आधार मिळत असे. त्यानुसार सातारा जिल्ह्यातील औंध या पंतप्रतिनिधींच्या राजधानीत कै. रावजी पाध्ये म्हणजे बुवांचे वडील दाखल झाले. तेथे किन्हईच्या यमाईदेवी मंदिरात देवीची पूजाअर्चा उपासना, पुराण सांगणे वगैरे धार्मिक विधी करून सुखाने संसार करू लागले. यथावकाश गणेशाची मुंज झाली. मात्र लगेचच रावजीबुवांचे निधन झाले आणि गणेशाच्या आयुष्याची परवड सुरू झाली.

शिक्षणासाठी पाध्ये बुवांना गोळवली जवळील देवरुख या तालुक्याच्या गावी नातलगांच्या आश्रयाने रहावे लागले. प्राथमिक शिक्षण संपताच ते साताऱ्याला संस्कृत शिक्षणासाठी आले. संस्कृत बरोबरच त्यांचा गाण्याकडेही कल होता. सातारा येथे पं. भास्करबुवा बखले यांचे गाणे ऐकावयास मिळाले. बुवांकडे चौकशी करून त्यांनी गाणे शिकण्याचे पक्के केले.

त्यानंतर गुजरातमधील नवसारी येथे ते गेले आणि संस्कृत बरोबरच फैज महंमद फत्तेमहंमद यांचेकडे गायनाचे धडे घेण्यास सुरुवात केली आणि बऱ्याच चिजा आत्मसात केल्या.

पुढे प्रथम बडोदा व नंतर धार येथे जाऊन ध्रुपद धमार चे शिक्षण पं. लालजी महाराज (अनंत रामचंद्र ढेकणे) यांचेकडून प्राप्त केले.

शिक्षण पूर्ण होतांच त्यांचा विवाह जमखंडी येथील रा. ब. सप्रे यांच्या कन्येशी संपन्न झाला. काही काळानंतर हैद्राबाद येथे गेले असतां पूज्य भटजीबापू महाराज यांनी त्यांना गानविद्या व पार्थिवपूजा यांची दिक्षा दिली ती त्यांनी अखंड पाळली.

आतापावेतो बुवांनी ख्याल, ध्रुपद,



धमार, ठुमरी, टप्पा, अष्टपदी वगैरेत प्राविण्य प्राप्त केले होते. काही काळ ग्वाल्हेर येथे पं. गुणेबुवा यांचेकडे गानसाधना व बरोबरच सुगंधी द्रव्ये आयुर्वेदीय औषधे यांचे प्रशिक्षण घेऊन त्यांत ते मर्मज्ञही झाले. तथापि त्यांना एवढ्यावर समाधान मानून बसवेना.

पं. बखले बुवांच्या ओढीने ते पुण्यास आले व पर्वती संस्थानात राहून सेवा करू लागले. यावेळी त्यांना पंढरपूरकर बुवा, दिवटेबुवा, चिंतोबा गुरव यांची साथ लाभली.

संगीताच्या आवडीमुळे रसिकराज साहित्यसम्राट्अ न.चिं. केळकर, प्रा. ना.सी.फडके, म.मो.द.वा.पोतदार, प्रा. नारळीकर वगैरे थोर पुणेकरांची ओळख त्यांना झाली व मैत्रीही झाली. एवढ्यांत धुळे येथील सरकारी ट्रेनिंग कॉलेजांत गायन शिक्षकाची नोकरी प्राप्त झाली आणि ते धुळ्यास आले.

बुवांचे चाहते व शिष्यगण यांचा पसारा खूप मोठा होता. पं. छोटा गंधर्व, तसेच श्रीमती लीलाताई पुस्तके (अमेरिका) यांनी बुवांकडे गायनाचे धडे गिरवले होते असे त्यांनीच मला सांगितले होते. बुवा तत्त्वनिष्ठ होते. नाटकांत गेल्यास गानकलेचा व्यापार होईल अशा समजुतीने ते नाटक कंपन्यापासून दूर राहिले. परिणामी संसार ओढग्रस्त स्थितीत राहिला. उपजीविकेसाठी मुलांना औषधाचे दुकान सुरू करून दिले व ते त्यांनी नावारुपास आणून दिले.

१९३८ साली एक मुलगा आणि एकुलता एक जावई यांचे निधन झाले. तो बुवांवर मोठा आघात होता. मुलीला धुळ्यास घर घेऊन दिले व सगळेच कायमस्वरुपात धुळ्यांस स्थायीक झाले आणि विरक्त होऊन बुवांनी तानपुरा कायमचा खाली ठेवला.

दि. ५.४.१९४७ रोजी धुळ्यांतच त्यांचे मेंदूज्वराने निधन झाले आणि गान साधनेतला एक अध्याय संपला. दुर्दैवाने त्याची गानपरंपरा आता त्यांचे घराण्यात सुरू राहिली नाही. मात्र पुण्याच्या भारत गायन समाजाशी संबंध असल्याने तेथे त्यांचे छायाचित्र मा. द. वा. पोतदार यांचे हस्ते लावण्यात आले आहे व चित्ररुपाने त्यांच्या स्मृती आजही हयात आहेत. टीप :– १) कोल्हापूरचे पाध्ये बुवा व धुळ्याचे पाध्येबुवा या वेगळ्या व्यक्ती होत. २) बुवांना मी भेटलेलो नाही मात्र त्यांचा अल्पपरिचय त्यांचे पुत्र हरिभाऊ व नात कै. सौ. सुमती हर्डीकर यांच्या टिपणावर आधारित आहे.

**– द. वि. हर्डीकर**
**मो. ९३७३५९९०८५**

---

एक सरदारजी कापड खरेदीसाठी दुकानात जातो आणि म्हणतो
**सरदार –** शर्ट के लिए कपडा दिखाना।।
**सेल्समन –** प्लेनमे दिखाऊं
सरदार भडकतो आणि म्हणतो 'नहीं हेलिकॉप्टर में दिखा।
साले बंदर जहाँ सरदार दिखा नहीं की मजाक शुरु।'

---

**सासूबाई (सुनेला)** – हे बघ मी या घरात गृहमंत्री आहे अर्थमंत्रालयही मीच सांभाळते,
तुझे सासरे परराष्ट्रमंत्री तर तुझा नवरा अन्न व वस्त्र पुरवठा मंत्री आहे. तुझी नणंद नियोजन व देखरेख मंत्रालय संभाळते तुला कोणतं खात हवं?
**सुनबाई –** मी आपली विरोधी पक्षातच बसते.